# २३) श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा कुटुंब व्यवस्थेसंबंधी विचार

**ह. भ. प. श्री. सुभाष महाराज गेठे**

कोणत्याही लहान मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास हा कुटुंबातील सदस्यांच्या व्यवहाराचे अवलोकन करूनच झालेला असतो. आईच्या पुण्याईने मुले सुशील निघतात, वडिलांच्या पुण्याने मुले चतुर आणि हुशार बनतात, वंशाच्या पुण्याने दातृत्ववान, उदार बनतात आणि स्वतःच्या पुण्याने मुले भाग्यवान बनतात. कुटुंबात आई-वडील, आजी-आजोबा, चुलता-चुलती, काका-काकी, बहीण-भाऊ, मामा-मामी, काका-मावशी असे अगणित नातेसंबंधी असतात. मुलांना या सर्वांचाच सहवास लहानपणीच आलेला असतो. एकत्रित कुटुंबपद्धती ही खरी भारताची ओळख आहे. एकत्रित कुटुंबपद्धती ही भारताचा आत्मा आहे. निःस्वार्थपणे एकत्रित कुटुंबात एकमेकांची काळजी घेताना आपण अनेकदा पाहिले किंवा ऐकले असेल. घरामध्ये अनेक पाहुण्यांची ये-जा चालू असते. सर्वच पाहुणे जाताना किंवा येताना लहान मुलांशी हितगुज करतात, त्यांना खाऊ देतात तर कधी पैसे भेट म्हणून देतात. यामुळे मुलांचीही पाहुण्यांशी जवळीक साधली जाते. यातूनच मुलांना व्यक्ती, कुटुंब आणि समाजातील विविध घटकांचा परिचय होतो. लहान वयात मुलांचे शिक्षण किंवा ज्ञान हे शिकविलेल्या पेक्षा अनुकरणांनी जास्त वाढते. कुटुंबात होत असलेले एकमेकांशी संवाद, त्यासाठी वापरले जाणारे शब्द आणि भाषा तसेच त्यांच्या देहबोली या सर्वांच्या वर लहान मुलांचे बारकाईने लक्ष असते, त्याचेच ते अनुसरण करतात. मुले जर असभ्य, असंस्कारित, अर्वाच्य,

औधात्यपूर्ण शब्दप्रयोग करत असतील तर त्याला जबाबदार कुटुंबातील व्यक्तींचा व्यवहारच होय.

मुले जसजशी मोठी होत जातात तसतसे घरातील आई-वडील यांच्यातील व्यवहार सभ्यतेचा असावा, कारण लहान मुले आई-वडिलांच्या सहवासात अधिक काळ असतात. त्यांचे चालणे-बोलणे, वागणे, देहबोली इतरांशी त्यांचे असलेले संबंध मुले पाहत असतात, लक्षात ठेवतात आणि काळाने तशीच कृती करतात. यासंबंधी श्री ज्ञानेश्वर महाराज सांगतात की...

**येथ वडील जें जें करिती। तया नाम धर्मु ठेविती।**
**तेंचि येर अनुष्ठिती। सामान्य सकळ।।१५८।।** अ. ३

घरातील मोठी माणसे जे-जे करतात त्यालाच प्रमाणभूत मानून लहान मुलेही त्यांचेच अनुकरण करत असतील तर घरातील मोठ्या व्यक्तींनी किती सावधानपूर्वक आणि सतर्कतेने किंवा दक्षतेने वागले पाहिजे. भगवान श्रीकृष्णाचेही या संबंधाने असेच म्हणणे आहे.

**यद् यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः।**
**स यत् प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते।।२१।।** अ. ३

आई मुलांचे खूप लाड आणि प्रेम करत असते, एक घास २० ठिकाणी करून मुलाला खाऊ घालते, त्याप्रमाणे तिने (आईने) मुलांच्या मनाला संस्कार आणि बुद्धीला विचार देत जावे.

**पैं बाळ जैं जेवविजे। तैं घांसु विसा ठायीं कीजे।**
**तैसें एकचि हें चतुर्व्याजें। कथिलें आम्हीं।।९५०।।** अ. १३

माता जिजाऊने शिवरायांना किंवा माता मदलसाने तिच्या मुलांना शिक्षणाच्या बरोबर संस्कारही दिले होते. मुलांचा आणि आई-वडिलांचा अत्यंत मनमोकळेपणाचा सुसंवाद असावा लागतो, त्याप्रमाणेच मुलांचाही तितकाच प्रेमपूर्वक सुसंवाद आणि आदर

असावा. जगात जेवढी तीर्थे आहेत त्या सर्व तीर्थांपेक्षा सर्वश्रेष्ठ तीर्थ म्हणजे आई – वडील असतात. त्यांच्या सेवेसाठी संपूर्ण शरीर जरी झिजवले तरी कमीच आहे, असे श्री ज्ञानेश्वर महाराज सांगतात.

**सकल तीर्थांचिये धुरे। जियें कां मातापितरें।**
**तयां सेवेसी कीर शरीरें। लोण कीजे।।२०७।।** अ. १७

सर्वश्रेष्ठ आदर मुलांचा आई–वडिलांविषयी जर कायम राहिला तर जगात कुठे वृद्धाश्रमच दिसणार नाही. मुलांना लहानाचे मोठे करताना जेवढा त्रास आई–वडील सहन करतात तेवढा त्रास किंवा सहनशीलता मुलांनी राखली तर आणि तरच त्यांनी मुलांचे कर्तव्य पार पाडले असे म्हणावे लागेल.

**तें कारण मनीं धरिलें। मग सरोष बोलों आदरिले।**
**जैसें मातेच्या कोपीं थोकलें। स्नेह आथी।।८८।।** अ. २

**परी अहितीं कोपोनि सोप। लालनीं मऊ जैसें पुष्प।**
**तिये मातेचें स्वरूप। जैसें कां होय।।१२३।।** अ. १६

मुलांनी कितीही अपराध केले तरी आई–वडील त्यांचे अपराध माफ करतात परंतु अपराधाची मर्यादा ओलांडली गेली तर मुलांचे कल्याण व्हावे या हेतूने त्यांना कठोर शिक्षा देण्यासही मागे पुढे पाहत नाहीत. त्यांचा या कृतीमागे त्यांचे मुलांबद्दलचे प्रेमच असते.

**पुत्राचे अपराध। पिता साहे निर्द्वंद्व।।** – श्री तुकाराम महाराज

वडील त्यांच्या मुला–मुलींना सर्व प्रकारचे शिक्षण देण्यासाठी सदैव तत्पर राहतात. त्यासाठी कोणताही त्याग करण्यास मागे–पुढे पाहत नाहीत.

**परी श्रुतिस्मृतींचे अर्थ। जे आपणचि होऊनि मूर्त।**
**अनुष्ठानें जगा देत। वडील जे।।८६।।** अ. १७

वडील ते असतात, की जे अनेक पद्धतींचे शिक्षण घेऊन प्रत्यक्ष सदाचरण करून मुलांना शिकविण्यासाठी प्रवृत्त होतात. त्यांना अनेक समस्यांतून बाहेर पडण्याची कुवत प्रदान करतात. त्यांना सर्व कार्यात कुशल बनवतात. त्यांच्या या कृपेतून कसे मुलांनी उत्तीर्ण व्हावे? यासंबंधीचा मोलाचा संदेश श्री ज्ञानेश्वर महाराज देतात. पृथ्वीतलावर जेवढी मुले-मुली आहेत त्या सर्वांचे एकत्रित कर्तव्य एकमुखाने श्री ज्ञानेश्वर महाराज पुढीलप्रमाणे सांगतात...

**आम्हीं जें जें जोडावें। तें समस्तीं इहीं भोगावें।**
**हे जीवितही उपकारावें। काजीं यांचां।।२१७।।** अ. १



पुत्रांनी अथवा पुत्रींनी शरीराने, मनाने, बुद्धीने जे-जे मिळविले असेल ते-ते सर्व आई-वडिलांच्या उपयोगाचे होत असेल, इतकेच नव्हे तर संपूर्ण आयुष्यही मातृ-पितृ सेवेत खर्च होत असेल तर आपण आपले कर्तव्य पार पाडले असे होईल. याच्या उलट आई-वडिलांनी उत्तम प्रतीचे शिक्षण देऊन आपल्या अपत्यांना प्रशिक्षित केले असेल, असे प्रशिक्षित पुत्र सगळ्या जगाशी प्रेमाने बोलत असतील आणि आई-वडिलांशी एक शब्दही ठीक बोलत नसेल तर ते केवळ मूर्ख आहेत, असेच श्री ज्ञानेश्वर माउलींचे मत आहे.

**तरी घरीं मातापितरां। धड बोली नाहीं संसारा।**
**येर विश्व भरी आदरा। मूर्खु जैसा।।५९५।।** अ. १८

## कुटुंबात अशांतता निर्माण होण्याची कारणे :

सतत भांडण आणि कलह हे कुटुंबात होत असतील तर त्या कुटुंबात नेहमी अशांतता, असमाधान, चिडचिड, मनोउद्विग्नता यांसारख्या समस्या उद्भवतात. ज्याप्रमाणे दोन वाळलेली लाकडे एकमेकांना घासून त्यातून अग्नी निर्माण होतो, त्या अग्नीने सर्व लाकडे जळून भस्म होतात. त्याप्रमाणे कुटुंबात सतत भांडण आणि कलहाने कुटुंब व्यवस्था उध्वस्त होते.

**जैसें काष्ठें काष्ठ मथिजे। येथ वन्हि एक उपजे।**
**तेणें काष्ठजात जाळिजे। प्रज्वळलेनि।।२४३।।** अ. १

कुटुंब व्यवस्था नीट राहण्यासाठी घरात नेहमी मोठी माणसे असावीत आणि त्यांच्याविषयी आदरही असावा. त्यामुळे घरात नीती-नियमांचे पालन आपोआप होते. परंतु घरात जेंव्हा मोठी माणसे नसतात तेव्हा कोणत्याच नीती मूल्यांचे पालन घरात होत नसेल तर घरातील माणसे स्वैर वागू लागतात. श्रेष्ठ आणि कनिष्ठ यांच्यामध्ये सरमिसळ होते. वर्ण धर्मामध्ये सदोषता निर्माण होते आणि त्यातून कुटुंबातील महिलावर्ग

असुरक्षित होऊ लागतो. पारंपरिक चाली-रीती, संस्कृती या संपूर्ण नष्ट होतात. चव्हाट्यावर ठेवलेल्या भाताच्या पिंडावर कावळे जसे चहू बाजूने झडप घालून घेऊन जातात किंवा शरीराच्या एका बाजूला झालेल्या सर्पदंशाचे विष सर्व शरीरात पसरते, त्याप्रमाणे कुटुंबात नीती-नियम, जगण्यातले मूल्य संपले की अनेक अनर्थ रूपी कावळे घरातील सदस्यांवर झडप घालून अनैतिक कृत्याकडे घेऊन जातात. सर्व कुटुंबात दोषांचे विष पसरते. नीतिमूल्ये दीपस्तंभाप्रमाणे कुटुंबाला मार्गदर्शन करतात, म्हणून त्यांचे आचरणही करणे आवश्यक आहे.

**असता दीपु दवडीजे। मग अंधकारीं राहाटिजे।**
**जे उजूंचि का आडळिजे। जयापरी।।२४७।।**

**तैसा कुळीं कुळक्षयो होय। तये वेळी तो आद्य धर्मु जाय।**
**मग आन कांहीं आहे। पापांवाचुनि।।२४८।।**

**जैं यमनियम ठाकती। तेथ इंद्रियें सैरा विचरती।**
**म्हणवूनि व्यभिचार घडती। कुळस्त्रियांसी।।२४९।।**

**उत्तम अधमीं संचरती। ऐसे वर्णावर्ण मिसळती।**
**तेथ समूळ उपडती। जातिधर्म।।२५०।।**

**जैसी चोहटाचिया बळी। पाविजे सैरा काऊळीं।**
**तैसीं महापापें कुळीं। प्रवेशती।।२५१।।**

**मग कुळा देखा अशेखा। आंणि कुळघातका।**
**येरयेरां नरका। जाणें आथी।।२५२।।** अ. १

श्री ज्ञानेश्वर महाराजांनी कुटुंबव्यवस्थेचे फक्त विचारच मांडले नाहीत तर कुटुंबव्यवस्था जगून दाखवली आणि अनेक आदर्श कुटुंबांचे निर्माणही केले. माउलींनी आपल्या श्रेष्ठ बंधूंना म्हणजे निवृत्तिनाथांना गुरू म्हणून स्वीकारले. समाधीला जाईपर्यंत कधीसुद्धा अवज्ञा केली

नाही आणि आदर्श गुरू शिष्यांचे नाते जगाला जगून दाखवले.

मधुकरीच्या निमित्ताने उद्वेग झाल्याचे निमित्त करून सिद्धबेटात झोपडीचे दार बंद करून या निमित्ताने आपल्या छोट्या बहिणीला सर्वप्रथम काव्य निर्मितीची संधी दिली, समुपदेशनाची संधी दिली. योगीराज चांगदेव महाराज यांचे गुरू होण्याचे सद्भाग्यही मुक्ताईना प्रदान केले. संत मांदियाळी मध्ये मुक्ताईंना पुन्हा संत नामदेव महाराजांना समुपदेशनाची सुयोग्य संधी उपलब्ध करून दिली. त्याचप्रमाणे छोटे बंधू सोपान देव यांचीही तेवढीच प्रेमाने काळजी घेतली. आई – वडिलांच्या अनुपस्थितीची जाणीव आपल्या भावंडांना होऊ दिली नाही. मोठ्यांचा आदर आणि छोट्यांवर प्रेम ही मूल्ये त्यांनी जगून दाखवली. सातशे वर्षांपूर्वी भगिनी मुक्ताईच्या निमित्ताने भविष्यातील सगळ्या स्त्रियांना लिहिते–बोलते केले. माउलींच्या या परिवाराचा आदर्श संत नामदेव महाराजांच्या संपूर्ण कुटुंबावर प्रकर्षाने झालेला दिसतो. नामदेव महाराज हे त्यांच्या सगळ्या कुटुंबाचे गुरू आहेत. कुटुंबातील चौदाही सदस्य माउलींच्या परिवाराप्रमाणे संतत्वाला प्राप्त झालेले आहेत. नामदेव महाराजांच्या चार सुना, बहीण, पत्नी, आई, मुलगी, दासी जनाबाई या सर्व स्त्रियांनी मुक्ताईचा आदर्श घेऊन अभंग रचना केली. त्याचप्रमाणे नारा, गोंदा, विठा आणि महादा आणि स्वतः नामदेव महाराज या सर्वांनी अभंग रचना केली. नामदेव महाराजांनी तर मराठी, हिंदी इत्यादी भाषेत अभंग रचना केली. सर्व सदस्यांनी एकमेकांवरती खूप प्रेम केले, त्याचे कारण विठ्ठल भक्तीचे मूल्य त्यांच्या कुटुंबातील सर्व व्यक्तींच्या अंतःकरणात खोलवर रुजले होते. नामदेव महाराजांच्या कुटुंब सदस्यांचे वर्णन जनाबाईंनी एका अभंगात केले आहे.

**गोणाई राजाई दोघी सासू सुना। दामा नामा बाप लेंक।।१।।**
**नारा विठा गोंदा महादा चवघे पुत्र। जन्मले पवित्र त्याचे वंशीं।।२।।**

**लाडाई गोडाई येसाई साखराई। चवघी सुना पाहीं नामयाच्या।।३।।**
**लिंबाई ती लेकी आऊबाई बहिणी। वेडीपिशी जनी नामयाची।।४।।**

श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या भावंडांच्या आदर्शाचा प्रभाव जसा नामदेव महाराजांच्या संपूर्ण परिवारावर झाला तसाच प्रभाव संत चोखोबाराय यांच्याही परिवारावर झाला आहे. अस्पृश्य यातीत चोखोबारायांचा जन्म झाला. तत्कालीन समाजव्यवस्थेकडून त्यांच्या परिवाराचा खूप छळ होत होता. या काळात नामदेव महाराजांनी त्यांना आश्रय / आधार दिला. आपल्या जवळ केले आणि संपूर्ण कुटुंबाचे ते गुरू बनले. विठ्ठल नामाची दीक्षा दिली. स्वतः नामदेव महाराजांनी चोखोबारायांचे लग्न जमवले व त्यांच्या बहिणीचे लग्नही जमवून दिले. आपल्यासारखे संतत्व बहाल केले आणि सर्व कुटुंबातील सदस्यांना लिहिते-बोलते केले. संपूर्ण चोखोबारायांच्या कुटुंबात संत नामदेवांनी विठ्ठल भक्तीचे बीज पेरले. त्यामुळे संत चोखोबाराय, त्यांची पत्नी संत सोयराबाई, त्यांचा मुलगा संत कर्ममेळा, बहीण संत निर्मळा, त्यांचा मेहुणा संत बंका, मुलगी संत भागुबाई हे सर्व संतांच्या मांदियाळीतील महत्त्वाचे संत बनले, आणि या सर्वांनी अभंग रचनाही केली. तसेच महाराष्ट्रात एक आदर्श कुटुंबव्यवस्थाही प्रस्थापित करून जीवनमूल्यधारित आदर्श जीवन जगूनही दाखवले.

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचे जीवनचरित्र, त्यांचे संपूर्ण वाङ्मय याचे बारकाईने अवलोकन करून त्यांनी प्रतिपादन केलेले सिद्धांत जर जगण्यात आणले तर हजारो सुव्यवस्थित कुटुंबव्यवस्था पुन्हा प्रस्थापित होतील. व्यक्तीत, कुटुंबात आणि समाजात सुख-शांती आणि समाधान याचबरोबर ईश्वर भक्तीची आणि जीवनमुक्तीची अनुभूती येईल.